**हटवांझरी ल. पा. यो. ता.मारेगाव जि. यवतमाळ योजनेस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.**

# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

**महामंडळ निर्णय क्रमांक: ३०४/विपाविम/कातां ३(१)/ (धा.क्र.७१/१८)/ हटवांझरी लपायो / प्रथम सुप्रमा / २०१९, दि. ११|०९|२०१९**

संदर्भ :-
१. महामंडळाचे पत्र क्र.विपाविम/कातां ६/३०४/हटवांझरी/प्रमा/(६१/२००८) , दि.२२.०७.२००८
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(३५/२०१५)/जसं(आ), दि. ०९.०९.२०१५.
३. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नासिक यांचे पत्र. क्र. रातांसस(१)हटवांझरी लपा/ धा.क्र.८८/२०१८)/३४६/२०१९ दि. २०.०३.२०१९.
४. दि.२०.०७.२०१९ रोजी झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र. बैठक-२०१९/(१८३/२०१९)/लपा, दि. २७.०८.२०१९
५. वि.पा.वि.म. नियामक मंडळाचे दि. २४.०७.२०१९ रोजी संपन्न ७५ व्या बैठकीतील ठराव क्र. ७५/२२

**प्रस्तावना :**

हटवांझरी लघु पाटबंधारे योजना, ही या महामंडळातंर्गत गोदावरी खो-यातील वर्धा उपखो-यात यवतमाळ जिल्ह्याचे मारेगाव तालुक्यातील हटवांझरी गावाजवळ स्थानिक नाल्यावर बांधण्यात येत आहे. सदर प्रकल्पाद्वारे यवतमाळ जिल्ह्यातील मारेगाव तालुक्यातील ३ गावांतील २७८ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्प आत्महत्याग्रस्त असलेल्या यवतमाळ जिल्ह्यातील असुन या प्रकल्पाचा समावेश बळीराजा जलसंजिवणी योजना मध्ये करण्यात आलेला आहे.

हटवांझरी लघु पाटबंधारे योजनेस संदर्भ क्र. १ नुसार सन २००७-०८ चे दरसुचीवर आधारीत रू. ८.२२ कोटी (रू. आठ कोटी, बावीस लक्ष फक्त) इतक्या रकमेस मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

बांधकामाचे दरम्यान योजनेच्या खर्चात, दरसुचीतील बदलामुळे झालेली वाढ, जास्त दराच्या निविदा स्विकृतीमुळे, भूसंपादन खर्चातील वाढ, , अपु-या तरतुदी, इतर कारणे व अनुषंगीक खर्च इत्यादी कारणांमुळे वाढ झाली असून योजनेची अद्यावत किंमत प्रशासकीय मान्यता किंमतीच्या दहा टक्क्याहून अधिक वाढत असल्यामुळे प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे.

हटवांझरी लघु पाटबंधारे योजनेचा सुप्रमा प्रस्तावाबाबत छाननी अहवाल राज्यस्तरीय तांत्रीक सल्लागार समिती(१), नाशिक, यांचे दि. ०८.०२.२०१९ रोजी संपन्न १२७ व्या बैठकीत अंतिम करण्यात आला असून पुढील कार्यवाहीस्तव संदर्भिय पत्र क्र. ३, नुसार प्राप्त झालेला आहे.

हटवांझरी लघु पाटबंधारे योजनेच्या प्रथम सुप्रमा प्रस्तावावर दि.२०.०७.२०१९ रोजी झालेल्या मा. सचिव स्तरावरील उपसमितीचे बैठकीत चर्चा होवून प्रस्ताव नियामक मंडळासमोर पुढील निर्णयार्थ सादर करण्यास सहमती दर्शविण्यात आली आहे.

संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार विदर्भातील प्रकल्पांना सु.प्र.मा. देण्याचे अधिकार महामंडळास प्रदान करण्यात आलेले आहेत.

दि. २७.०८.२०१९ रोजी झालेल्या नियामक मंडळाचे ७५ व्या बैठकीतील ठराव क्र. ७५/२२ नुसार हटवांझरी लघु पाटबंधारे योजनेच्या रू. २७.४५ कोटी अंदाजित किंमतीच्या प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मा. सचिव उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालनाचे अधीन राहून मान्यता दिली असून या बाबतचे आदेश कार्यकारी संचालक यांनी निर्गमित करण्याकरिता नियामक मंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे.

मंजूर प्रशासकिय मान्यतेच्या तुलनेत प्रकल्प किंमतीतील वाढ रु.१९.२३ कोटी म्हणजेच २३३.९४ % इतकी आहे. किंमत वाढीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत:-

| अ.क्र. | बाब | वाढ रू (कोटी) | मंजुर मुळ प्रमा किंमतीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दरसुचीतील बदलामुळे | ४.८१ | ५८.५२% |
| २ | जास्त दराची निविदा स्विकतीमुळे | ०.१७ | २.०७% |
| २ | भूसंपादनाच्या किंमतीतील वाढ | १०.१९ | १२३.९७% |
| ४ | अपु-या तरतुदीमुळे वाढ | १.६५ | २०.०७% |
| ५ | इतर कारणांमुळे झालेली वाढ | १.८८ | २२.८७% |
| ६ | अनुषंगीक खर्च वाढ | ०.५३ | ६.४४% |
| | एकुण | **१९.२३** | **२३३.९४%** |

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय :**

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आता या निर्णयान्वये यवतमाळ जिल्ह्यातील हटवांझरी लघु पाटबंधारे योजना, ता. मारेगाव जि. यवतमाळ या योजनेच्या एकूण अंदाजीत किंमतीस रू. २७.४५ कोटी (रू. सत्तावीस कोटी, पंचेचाळीस लक्ष फक्त) प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे. त्यापैकी रू. २५.६३ कोटी (रू. पंचवीस कोटी त्रेसष्ठ लक्ष फक्त) कामाप्रित्यर्थ व रू. १.८२ (रू. एक कोटी ब्यांशी लक्ष फक्त) अनुषंगीक खर्च आहे. अंदाजपत्रकात उर्वरीत कामांसाठी जलसंपदा विभागाची सन २०१७-१८ या वर्षाच्या दरसूचीप्रमाणे दर वापरण्यात आले आहेत. उपशिर्षवार तरतुदींचा गोषवारा परिशिष्ट-१ मध्ये संलग्न आहे.

१. ठळक बाबी –

| | |
|---|---|
| **अ) योजनेचे सिंचन क्षेत्र** | **- २७८ हेक्टर** |
| **ब) योजनेमुळे एकुण होणारा पाणीसाठा** | **- २.३५७२ द.ल.घ.मी. (२३५७ स.घ.मी.)** |
| **क) प्रति स.घ.मी. पाणीसाठा किंमत** | **- रू. १,१७,८५९/-(मापदंड रू.१,२२,१३२)** |
| **ड) योजनेचे लाभव्यय गुणोत्तर** | **- ०.५६ (मापदंड १.०० पेक्षा जास्त)** |

२. या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्र.आय -५, मुख्य लेखाशिर्ष "४७०२", लघु पाटबंधारे यावरील भांडवली खर्च, (८०)- सर्वसाधारण, (१९०)-सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका (००) (०५), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ भाग भांडवली अंशदान (४७०२ ५१०-१) या लेखाशीर्षाखाली खर्ची घालावा व विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडील मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. या योजनेस प्रदान केलेली प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता ( २५--/२०१९) या अनुक्रमांकावर नोंदविण्यात आली आहे.

४. सदर प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

४.१) सदर सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणजे प्रकल्प कार्यान्वयीन करण्याच्या विविध टप्प्यावर झालेल्या अनियमिततेस मान्यता गृहीत धरता येणार नाही.

४.२) या प्रकल्पाबाबत चालू असलेल्या अथवा प्रस्तावित विभागीय चौकशी कार्यवाही पूढे चालू ठेवावी. प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याच्या निर्णयामुळे विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस कोणतीही बाधा पोहचणार नाही.

४.३) आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नवीन घटकांचा शासन मान्यतेशिवाय समावेश करण्यात येऊ नये.

४.४) प्रगतीपथावरील निविदांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात यावीत. पाणीसाठ्याचा सिंचनाकरीता जास्तीतजास्त लाभ होईल अशा प्रकारे उर्वरित कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात यावा व त्यानुसार कामे/निविदा प्रक्रिया करण्यात यावी.

४.५) सदर प्रकल्पासाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन निधी वितरण अथवा अतिरीक्त खर्च करता येणार नाही. या संदर्भात प्रचलित शासन निर्णय, वित्त अधिकार मर्यादा, विहित केलेली निविदा कार्यपध्दती यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

४.६) राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या मुल्यार्पणअहवालात नमुद मुद्दा क्र. १ ते २७ मधील अभिप्रायाचे अनुपालन करण्यात यावे.

४.७) मा. सचिव उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालन करण्यात यावे.

४.८) प्रकल्पाचे काम नियोजना नुसार पूर्ण करण्यात यावे.

५. सदर महामंडळ निर्णयाची अंमलबजावणी निर्गमित दिनांकापासून करण्यात यावी.

६. सदर निर्णय जलसंपदा विभागाचे wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळा वरील विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे Mini Web Portal वर उपलब्ध करण्यात आला आहे.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे अध्यक्ष यांचे आदेशानुसार व नावाने.

"मुळ प्रत मा. कार्यकारी संचालक यांना मान्य"

अधीक्षक अभियंता
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,
नागपूर

प्रत सहपत्रासह,

१. स्वीय सहाय्यक, मा. मंत्री, जलसंपदा, मंत्रालय, मुंबई.-३२
२. प्रधान सचिव (जसं प्र व वि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
३. सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
४. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
५. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा), नागपूर.
६. वित्त विभाग, (व्यय-१२) मंत्रालय, मुंबई -३२
७. नियोजन विभाग, (कार्यासन १४३४), मंत्रालय, मुंबई -३२
८. विभागीय आयुक्त, अमरावती प्रदेश, अमरावती.
९. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती.
१०. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महामंडळ कार्यालय, नागपूर.
११. जिल्हाधिकारी, यवतमाळ
१२. अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे प्रकल्प मंडळ, यवतमाळ.
१३. कार्यकारी अभियंता, यवतमाळ प्रकल्प बांधकाम विभाग, यवतमाळ .
१४. विभागीय संपर्क अधिकारी. माहिती व जनसंपर्क संचालनालय, अमरावती
१५. कातां ७, संग्रहार्थ.
१६. चित्र शाखा १, संग्रहार्थ

\\Kt3\d\kt 3(1)\Hawanzari pratham सुप्रमा.doc

हटवांझरी ल.पा. योजना प्रकल्प,
ता.मारेगाव जि. यवतमाळ
या योजनेस प्रथम सुधारित प्रशासकीय
मान्यता देण्याबाबत.

**महामंडळाचा निर्णय क्रमांक** :विपाविम/कातां.३(१)/(धा.क्र. ७१/१८)/ हटवांझरी ल.पा.यो./२०१९
दिनांक :

**परिशिष्ट - १**
**हटवांझरी ल.पा. योजना प्रकल्प,**
**ता.मारेगाव जि. यवतमाळ**
**उपशिर्षवार तरतूदी.**

किंमत रु.कोटी

| अ. क्र. | उपशीर्ष | रक्कम | | तरतूद एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| | | शिर्ष कामे | मुख्य कालवा | |
| १ | "अ" प्राथमिक कामे | ०.०१ | ०.०६ | ०.०७ |
| २ | "ब" भुसंपादन | १३.०२ | ०.३९० | १३.४१ |
| ३ | "सी" मुख्य कामे | ७.४९ | ०.०० | ७.४९ |
| ४ | "डी" विमोचक | ०.२७ | ०.०० | ०.२७ |
| ५ | ई-प्रपात | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ६ | के-इमारती | ०.०५ | ०.०० | ०.०५ |
| ७ | "एम" वृक्षारोपण | ०.०१ | ०.०० | ०.०१ |
| ८ | "ओ" किरकोळ कामे | ०.०२ | ०.०० | ०.०२ |
| ९ | "पी" देखभाल दुरुस्ती | ०.०३ | ०.०० | ०.०३ |
| १० | "आर" दळणवळण | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ११ | "एक्स" पर्यावरण | ०.०४ | ०.०० | ०.०४ |
| १२ | "III" बंद नलिका व वितरण प्रणाली | ०.०० | ४.२४ | ४.२४ |
| | **एकूण कामाप्रित्यर्थ किंमत** | **२०.९४** | **४.६९** | **२५.६३** |
| | **अनुषंगीक खर्च** | १.८२ | | **१.८२** |
| | **योजनेची एकूण किंमत** | | | **२७.४५** |

**"मुळ प्रत मा. कार्यकारी संचालक यांना मान्य"**

**अधीक्षक अभियंता**
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,
**नागपूर**

\\Sanjiv\d\vidc41\TECH - 18\KT-3(1)\SALOD dt. 06.03.19हटवांझरी